Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -303 | SUNDAY DT.04 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०३ | रविवार,दि.०४ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रु | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# गहिनीनाथ गडावरचा सेवेकरी म्हणुन आलो आहे : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

बीड ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील गहिनीनाथ गड येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४८ व्या पुण्यतिथी महोत्सवासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते.या पुण्यतिथी महोत्सवाच्या कार्यक्रमात मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, उत्तम स्वामी, राज्याचे कृषी तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे, खासदार प्रीतम मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अँड प्रकाश आंबेडकर, आमदार बाळासाहेब आजबे, सुरेश धस, लक्ष्मण पवार, मोनिका राजळे,माजी मंत्री राम शिंदे आणि जयदत्त क्षीरसागर माजी आमदार भिमराव धोंडे, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे , डॉ.योगेश क्षीरसागर,जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकुर तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री फडणवीस पुढे म्हणाले मागच्यावर्षी मला ध्वज हातात देऊन सेवेकरी केले होते मी आपल्या मधलाच एक सेवेकरी आहे. इथल्या विकास कामांसाठी यापुर्वी २५ कोटीचा निधी दिलेला आहे. गरज पडल्यास पुन्हा २५ कोटींचा निधी देऊ असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

या ठिकाणी सुसज्ज स्वागत कमान, किर्तन मंडप, प्रसाद कक्ष बांधले जाईल. श्री.संत वामनभाऊ महाराजांवर प्रेम करणारे गरीब सेवेकरी याठीकाणी एकत्रित येतात त्यांची गैरसोय होऊ नये याची काळजी घेतली जाईल. या जिल्हयाला गडांचा समृध्द वारसा आहे. येथे नारायण गड, मच्छिंद्रगड, भगवान गड असे पवित्र तीर्थस्थळ आहेत. या सर्व मार्गावरून वारी जात असते. हा मार्ग चांगला होईल याची दक्षता घेतली जाईल. गहिनीनाथ गडावरुन पालखी जात असते. वारीच्या समयी वारकरांसाठी पंढरपूर येथे जागा मिळाली असून जागा दान देणारे आज आपल्या मध्ये आहेत हा सुवर्ण क्षण असल्याचे ते यावेळी म्हणाले.यावेळी येथील विविध विकास कामांचे भुमीपुजन करण्यात आले . याप्रसंगी भाविकांवर टाळ मृदंगाच्या गजरात मंचावरून पुष्पवृष्टी करण्यात आली.

इथल्या पुण्यतिथीचा कार्यक्रम करण्याचा मान आमच्या कुंटूबींयाचा आहे याचा आम्हाला अभिमान




आहे. वारकरी संप्रदायाची सुरूवात या ठिकाणपासून झाली हे येथील वैशिष्टय आहे. या गडाला मोठे करण्याचे काम येथील गोर गरीब जनतेने केले आहे. इथले विकास काम पूर्ण होऊन भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात हा माझा प्रयत्न असल्याचे ही त्यावेळी म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक खा. प्रितमताई मुंडे यांनी केले. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनाही यावेळी मनोगत व्यक्त केले.

## गहिनीनाथ गडाच्या माध्यमातून भाविकांची सेवा करता येते : धंनजय मुंडे

बीड जिल्हा अध्यात्माचा जिल्हा असून अनेक संत महात्मे या मातीत जन्माला आले आहे. गहिनीनाथ गड हे असेच स्थान आहे. या गडावरील श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्याने ही जमीन पुनीत झाली असून येथे भाविकांची सेवा मला करता येत असल्याचे पालक मंत्री धंनजय मुंडे यावेळी म्हणाले.

## जातीतील अंतर कमी करण्याचे काम संतानी तसेच संविधानाने केले : ॲड प्रकाश आंबेडकर

जाती जातीतील अंतर कमी करण्याचे काम संत महात्म्यांनी या मातीत केलेले आहे हे कार्य संविधानातूनही झाले असल्याचे प्रतिपादन ड प्रकाश आंबेडकर यांनी याप्रसंगी केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी या मावळयांच्या मदतीने स्वराज स्थापन केले. त्यांनी त्यांच्या पद्धतीने जाती व्यवस्था संपवली होती. माणसं ही माणसं म्हणुनच जगली पाहिजे. हीच बाब संविधानातून भारतीय म्हणुन आपल्याला मिळाली आहे. जोपर्यंत जाती अंत होत नाही तो पर्यंत माणुसपण निर्माण होऊ शकत नाही, असे ही ते यावेळी म्हणाले.

# अंबाजोगाई बसस्थानकाची दुरावस्था लवकरच संपणार



## वाहनतळ कॉंक्रीटकरणाच्या निविदा प्रक्रियेस सुरुवात

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई बसस्थानकाचे नुतनीकरण तर झाले, परंतु आतील रस्ता पूर्णपणे उखडल्याने मागील काही वर्षापासून प्रवाशांना धुळीचा सामना करावा लागत आहे. मात्र, आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यानंतर बसस्थानकातील वाहनतळ कॉंक्रीटकरण आणि इतर सुविधांच्या कामांच्या निविदा प्रक्रियेस सुरुवात झाल्याने लवकरच प्रवाशांची त्रासातून मुक्तता होणार आहे.

बीडनंतर सर्व शासकीय कार्यालयांची उपमुख्यालये अंबाजोगाई शहरात आहेत. तसेच, स्वाराती रुग्णालयात उपचारासाठी येणारे रुग्ण आणि शिक्षणासाठी अंबाजोगाईत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे येथील बसस्थानकात कायम वर्दळ असते. काही वर्षांपूर्वी या बसस्थानकाचे नुतनीकरण

(उर्वरीत पान २ वर)



## गहिनीनाथ गडाला धाकट्या पंढरीचे स्वरूप माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यात धार्मिक क्षेत्रामध्ये प्रमुख असलेल्या गहिनीनाथ गडाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे लाखो भाविकांचा जनसमुदाय या ठिकाणी एकत्रित येतो आणि संत वामन भाऊंच्या चरणी नतमस्तक होतो. दरवर्षी याठिकाणी धाकट्या पंढरीचे स्वरूप बघायला मिळत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. श्री क्षेत्र गहिनीनाथगड येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४८ व्या पुण्यतिथीनिमित्त मंचावर महंत श्री. ह.भ.प. विठ्ठल महाराज, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,

(उर्वरीत पान २ वर)

# चंपावती महोत्सव मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडकाचे भव्य आयोजन

**महाकरंडक स्पर्धेत ➤ सर्व शाळांनी सहभागी व्हावे- अनिलदादा जगताप**

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष तथा लाडके मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बाल कलाकारांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणारा बीडच्या सांस्कृतिक क्षेत्रातील मानबिंदू जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा दि.१५ फेब्रुवारी २०२४ ते २२ फेब्रुवारी २०२४ रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भव्य-दिव्य स्वरूपात संपन्न होणार आहेत.



या स्पर्धा महोत्सवात समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, समूह गीत गायन, वैयक्तिक गीत गायन, चित्रकला, फॅन्सी ड्रेस, फॅमिली डान्स स्पर्धा घेण्यात येणार असून याचे वेळापत्रक बीड जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये पोहचविण्यात येणार आहे.

(उर्वरीत पान २ वर)

बीडच्या इतिहासातील पहिला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रात चंपावती महोत्सव ही सर्वात मोठी सांस्कृतिक चळवळ असून या स्पर्धेत बीड इतिहासातील पहिला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या शुभहस्ते सर्वोकृष्ट शाळेला बहाल करण्यात येणार आहे. याबरोवरच पाच उत्कृष्ट मुख्यद्यापक, उपक्रमशील शिक्षक, उत्कृष्ट नृत्य शिक्षक, संगीत शिक्षक, चित्रकला शिक्षक आणि बीडमधील काही कलाकारांचा यांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे. याबरोबरच महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष तथा लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचा वाढदिवस देखील साजरा करण्यात येणार आहे.

# आरोग्यसेवा कशी करावी, याचे उत्तम उदाहरण बाजीराव चव्हाण

## उद्योगमंत्री उदयजी सामंत यांच्याकडून प्रशंसा बीड येथील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षास भेट



### आता बाजीराव चव्हाण यांनी नवी जबाबदारी घ्यावी : मंत्री सामंत यांची सूचना

मंत्री उदयजी सामंत यांनी बाजीराव चव्हाण यांचे आरोग्य सेवेतील काम पाहता आता त्यांनी नवी जबाबदारी घ्यावी,अशी सूचना मंत्री महोदय यांनी केली. राज्यभर युवा सेनेच्या प्रत्येक कार्यकर्त्यांना आरोग्य सेवेच्या ज्या योजना आहेत, त्याचे प्रशिक्षण देण्यात यावे, जेणे करून सरकारच्या आरोग्यसेवेचा समाजातील शेवटच्या घटकांना न्याय मिळेल.

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे संवेदनशिल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवा कशी करावी, याचे उत्तम उदाहरण म्हणजे आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण होय, अशा शब्दांत राज्याचे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांनी प्रशंसा केली. बीड येथील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षास २ फेब्रुवारी रोजी मंत्री महोदय यांनी सदिच्छा भेट दिली. युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात सर्व टीमशी संवाद

(उर्वरीत पान २ वर)



## लिंगायत आरक्षणासाठी उदगीरमध्ये १२ ला मोर्चा

प्रतिनिधी लातुर

लिंगायत व हिंदू लिंगायत यांना वाणी नावाला लागू असलेले आरक्षण मिळण्यासाठी लिंगायत महासंघातर्फे १२ फेब्रुवारीला उदगीर येथे, २८ फेब्रुवारीला सोलापूर तर पाच मार्चला मुंबईच्या आझाद मैदानावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची

(उर्वरीत पान २ वर)

# नाट्यसंमेलनाने फेडले बीडकरांच्या डोळ्याचे पारणे

## डॉ.दीपाताई क्षीरसागर यांचे मार्गदर्शन, डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे सुरेख नियोजन



## हस्तांतरण सोहळ्यात नटराज मूर्ती, नाट्यघंटा लातूरच्या शाखेकडे सुपूर्द

बीड ।प्रतिनिधी

शहरात झालेले अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विभागीय नाट्य संमेलन ऐतिहासिक आणि बीडकरांच्या डोळ्याचे पारणे फेडणारे ठरले. या नाट्य संमेलनांतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना बीडकरांनी तुफान गर्दी केली. नाट्य परिषदेच्या बीड शाखाध्यक्ष डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्वागताध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर यांच्या नियोजनातून हा देखणा सोहळा उत्साहात झाला.

बीड येथे आयोजित १०० व्या विभागीय नाट्य संमेलनात शेवटच्या टप्प्यात नाट्यघंटा व नटराज मूर्तीचे हस्तांतरण लातूरला करण्यात आले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले

(उर्वरीत पान २ वर)



संपादकीय

## ‘भाकरी फिरवण्याची’ गरज

साहित्य, समाज आणि संमेलने यातील ‘साजरे करण्याची’ वृत्ती कशी घालवता येईल, यावरच आत मंथन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. गेली काही वर्षे अध्यक्षीय भाषणाची एक पठडी ठरून गेली आहे.

एखाद्या साहित्य संमेलनामुळे अनेक साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक चर्चा झडाव्यात आणि बौद्धिक घुसळण व्हावी अशी अपेक्षा असते. अशा घुसळणीतूनच नवा विचार जन्माला येतो. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाने गंभीर विचार मांडावा, समाजासमोरील, साहित्य विश्वासमोरील प्रश्नांचा धांडोळा घ्यावा, हे सुद्धा आता इतके नित्याचे झाले आहे की असे सर्व ‘मौलिक विचार’ संमेलनाच्या मांडवातच विरून जातात.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची परंपरा शंभरीकडे वाटचाल करीत असताना, ९७ व्या संमेलनाच्या निमित्ताने ज्या चर्चा होत आहेत, त्यांची दिशा आणि संमेलनाची दशा या दोन्हीचा विचार करायची गरज आहे. साहित्य, समाज आणि संमेलने यातील ‘साजरे करण्याची’ वृत्ती कशी घालवता येईल, यावरच आत मंथन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. गेली काही वर्षे अध्यक्षीय भाषणाची एक पठडी ठरून गेली आहे. ज्या गावात संमेलन होत आहे, त्या गावाचा, गावाशी संबंधित महनीय व्यक्तींचा महिमा सांगायचा, थोडी आत्मचरित्रात्मक माहिती सांगायची आणि ज्या साहित्य प्रकाराशी आपला संबंध आहे, त्याबाबत थोडे चिंतन करायचे. याच्या जोडीला मराठी भाषेची चिंता, राजकारण्यांच्या सहभागाविषयी थोडीफार चर्चा, नव्या लेखकांची दखल अशा मार्गानेच संमेलनाची वाटचाल असते. ९७ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे यांचे भाषणही बव्हंशी याच पद्धतीचे आहे. विधान परिषदेत साहित्य-संस्कृती क्षेत्रातील व्यक्तींची नियुक्ती होत नसल्याचा मुद्दा शोभणे यांनी थेट व स्पष्ट शब्दांत मांडला, याबद्दल त्यांचे कौतुकच; परंतु राजकारणी हा मुद्दा एका कानाने सुद्धा ऐकणार नाहीत, त्यामुळे दुसऱ्या कानाने तो सोडून देण्याचा प्रश्नच नाही.

संमेलनाध्यक्षाच्या निवडीपासून तर संमेलन प्रत्यक्षात होईपर्यंतचा सगळा माहोल आणि उदासीनता जर लक्षात घेतली तर सध्या झालेल्या संमेलनांचा सुकाळ लक्षात येतो. जागतिक मराठी परिषदेचे संमेलन, विश्व मराठी साहित्य संमेलन आणि आता अखिल भारतीय साहित्य संमेलन लागोपाठ होत आहे. शिवाय, मराठी राजभाषा विभागाचा पंधरवडा नुकताच झाला. विद्रोही साहित्य संमेलनाचा प्रवासही काही वर्षे समांतर सुरू आहेच. ही सगळी संमेलने मिळून शंभरेक परिसंवाद, त्यातील पाचेकशे सहभागी तज्ज्ञांची मत-मतांतरे यातून मराठी साहित्याचे काय भले झाले, कुठला एखादा नवा प्रकल्प आकाराला आला याचा विचार करण्याची वेळ आली आहे. संमेलनात ज्या घोषणा केल्या जातात, आश्वासने दिली जातात, त्याचे पुढे काय होते याचा हिशेब कुठल्या तरी अध्यक्षाने सरकारकडे मागितला आहे का? तो मागावा एवढा अधिकार आणि दबाव आणण्याची क्षमता कुठल्या अध्यक्षांकडे यापुढे असू शकेल का? या प्रश्नांची उत्तरे फार काही उत्साहवर्धक नसतील. महाराष्ट्र सरकारने मराठी भाषेसंदर्भात जाहीर केलेल्या योजनांवर ठरलेल्या तरतुदींपैकी पाच-दहा टक्के रक्कम फक्त खर्च झाली असल्याची बातमी ‘महाराष्ट्र टाइम्स’ने अलीकडेच प्रसिद्ध केली होती. त्यावर संमेलनाच्या अध्यक्षांसह कुठल्याही मोठ्या साहित्यिकाने सरकारला जाब विचारला नाही. उलट मंत्रिमहोदयांनी काल पुन्हा घोषणांचा सुकाळ करून टाकला. दहावीपर्यंत मराठी भाषा सक्तीची करण्याच्या घोषणाही वारंवार होत असतात, त्याचे पुढे काय होते यावर कधीच बोलले जात नाही. बालकवींचे स्मारक धरणगाव येथे उभारण्यात येणार होते, तर बहिणाबाईंचे स्मारक असोदा येथे उभारण्यात येणार होते. ही दोन्ही स्मारके अपूर्ण असतानाच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संमेलनात साने गुरूजींच्या स्मारकाची घोषणा केली. व्यासपीठावरून उतरल्या क्षणी नेत्यांना स्वतःच्या घोषणांचा विसर पडतो.

संमेलनात ‘विभागवार सहभाग’ असला पाहिजे या भावनेतून परिसंवादातील सहभागी, वक्ते, कवी यांची निवड केली जाते. त्यातून पंधरा-वीस वर्षांत किती नव्या प्रतिभा पुढे आल्या, याचीही उजळणी गरजेची आहे. जत्रेचे स्वरुप असले तरीही मराठी भाषेचा एक भव्य सोहळा म्हणून संमेलने होण्याची गरज आहे, असे यापूर्वी अनेकदा म्हटले गेले

## राहुरी येथील वकील दांपत्याच्या हत्याकांडाचा बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने जाहीर निषेध

बीड ।प्रतिनिधी

राहुरी तालुका राहुरी जिल्हा अहमदनगर येथील कै.अँड. राजाराम आढाव व त्यांची पत्नी कै.अँड. मनीषा आढाव यांचा खंडणीकरिता मागील काही दिवसापूर्वी खून करण्यात आला या खुणाच्या निषेधार्थ बीड जिल्हा वकील संघाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढून निषेध नोंदवण्यात आला आहे.

वारंवार न्यायालयात होणाऱ्या वकिलांना मारहाणीच्या विरोधात वकील संरक्षण कायदा दुरुस्ती करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी तसेच सर्व वकिलांना स्वसंरक्षणाकरिता शास्त्रास्त्र परवाने देण्यात यावे वकील संरक्षण कायद्यामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीत वकिलास न्यायालयीन कामकाजासाठी संरक्षण मिळणे गरजेचे आहे प्रत्येक वकिलास ज्या पद्धतीने सरकारी सेवकास ३५३



या कलमाचं संरक्षण देण्यात आलेला आहे त्या पद्धतीने प्रत्येक वकील आला नवीन होणाऱ्या आयपीसी मध्ये नवीन कलम घेऊन त्या प्रकरणाला ट्रायल सेशन असे करण्यात यावे अशा आशयाची मागणी बीड जिल्हा वकील संघाच्या सर्व कार्यकारिणीने तथा सदस्यांकडून करण्यात आले .



## अशोक सगळे यांची शिवसेना उ. बा. ठा. पक्षाच्या बीड उपतालुकाप्रमुख पदी निवड

बीड ।प्रतिनिधी

संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार यांच्या हस्ते व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले आले.यावेळी महिला आघाडीच्या जिल्हासंघटिका संगीताताई चव्हाण , उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप , उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले ,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , शहरप्रमुख निजामभाई शेख , फरजाना भाभी शेख ,रविअणणा वाघमारे, रामनारायण जाधव , रमेश नवले ,यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## अखेर लिंबागणेश येथील स्मशानभूमीच्या कामास सुरुवात

### स्मशानभूमीतील सरण रचुन ठिय्या आंदोलनाची दखल:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश येथील जीर्ण स्मशानभूमीचे बांधकाम पडलेले असुन पत्र्यांची मोडतोड झाल्याने स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन पावसाळ्यात अंत्यसंस्कारास अडचणी येत असुन मृतदेहाची हेळसांड होत असल्याने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी यासाठी लिंबागणेश येथील स्मशानभूमीत सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते याची दखल घेत आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा नियोजन समितीमधुन ८ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असुन स्मशानभूमीच्या बांधकामास सुरुवात झाली असुन एकंदरीत डॉ.गणेश ढवळे यांच्या आंदोलनास यश आले आहे.

## अयोध्येत पौराहित्य करणार्या वेदमूर्तींचा आज सन्मान

बीड ।प्रतिनिधी

अयोध्येत पौरोहित्य करणार्या वेदमूर्तींचा बीड शहरातील ब्राह्मण समाजाच्या वतीने ज्या पुरोहित बांधवांनी रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामध्ये सहभाग नोंदवून वेदमंत्रौचार आणि घोष केला. तसेच तेथील विविध धार्मिक कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवून आपल्यामधील वेद अध्यायनाचा अविष्कार दाखविला त्या वेदमूर्ती सर्व ब्रह्मवृंदांचा शहरातील ब्राह्मण समाजाच्या वतीने आज रविवार दि.०४ रोजी संध्याकाळी ५ वाजता अमृत मंगल कार्यालय मध्ये सन्मान करण्यात येणार असून या कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

यामध्ये वे.शा.सं.श्री नारायणदेव सुलाखे,वे.मू.अनंतशास्त्री मुळे गोंदीकर,वे.शा.सं.चंद्रशेखर भोगे, वे.शा.सं. ऋषीकेश पाठक राजेवाडीकर माजलगाव, वे.शा.सं दिवाकर रामदासी माजलगाव, वे.मू. गजानन ज्योतकर, वे.मू. घनश्याम भोगे, वे.शा.सं.मिथुन निर्मळ, वे.शा.सं.अजित पारगावकर, वे.शा.सं.संतोष जोशी कुर्लेकर, ह.भ.प.एकनाथ महाराज पुजारी, ह.भ.प.विनायक पाटांगणकर व सौ निलिमा पाटांगणकर यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास ब्राह्मण समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.




## यशवंत सेनेच्या गेवराई महिला तालुकाध्यक्ष पदी सौ.सविता ढवारे यांची निवड

शेख आतिख/तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सौ.सविता ढवारे यांचे सामाजिक कार्य पाहता यशवंत सेनेचे जिल्हाध्यक्ष भारत सोन्नर यांनी सौ सविता ढवारे यांची यशवंत सेनेच्या गेवराई तालुकाध्यक्षपदी नियुक्ती पत्र देवुन निवड केली गोर गरीब समाजातील प्रश्न शासन दरबारी मांडुन समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न मी यशवंत सेनेच्या माध्यमातून करेल अशी ग्वाही सौ.सविता ढवारे यांनी यावेळी दिली माझ्यावर विश्वास ठेवुन संघटनेने माझ्यावर तालुकाध्यक्ष पद देवुन जो विश्वास ठेवला त्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही असा विश्वास हि सौ.सविता ढवारे यांनी दिला त्यांच्या या निवडीने समाज बांधवांनी व गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला यावेळी यशवंत सेनेच्या जिल्हाध्यक्ष भारत सोन्नर लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे, इजराइल पठाण, मल्हार आर्मीचे तलवाडा सर्कल प्रमुख प्रल्हाद मस्के, सतिष ढवारे, बाळु गिरी, भरत शिंगणे, पत्रकार शेख रहिम, नितीन श्रावणे, बाळु श्रावणे, तुकाराम तवले, भागवत धापसे, भागवत मस्के, नागेश स्वामी, व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मांजरा पूल रस्ता,केजच्या अपूर्ण कामासाठी केज विसंसचा पुन्हा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

केज/प्रतिनिधी

केज शहरातील खामगाव -पंढरपूर व अहमदपूर- अहमदनगर या महामार्गा वर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली काम करत असलेल्या एचपीएम व मेगा कंपण्यासह इतर काही कंपन्यांनी अत्यावश्यक कामे अद्याप पूर्ण केलेले नाहीत. या साठी येत्या सोमवार व मंगळवार रोजी या कंपन्या व महाराष्ट राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या विरोधात केज विकास संघर्ष समितीने तीव्र आंदोलन छेडण्याचा निर्धार केला आहे.केज शहरात अहमदपूर- अहमदनगर या महामार्गा वर एमएमआरडीसी अंतर्गत एचपीएम कंपनी काम करत आहे.गेली चार वर्षांपासून केज शहर अंतर्गत भागात कंपनी काम करत आहे मात्र अद्याप विहित मुदतीत कंपनीने आपली कामे पूर्ण केलेली नाहीत.या कंपनीने महामार्गावरील पथदिवे सुरू



केलेले नाहीत तसेच केजडी नदीवरील पूलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू ठेवले आहे,पुलाच्या जवळचा अर्धवट रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ कांही अपूर्ण रस्ता आणि केजपरिसरात केजचे उपजिल्हारुग्णालय जवळचा पूल,कदमवाडी पाटीजवळचा पूल,सांगवी पाटीजवळचा पूल इत्यादी भागात निर्माण झालेले कटाव दुरुस्त करणे गरजेचे आहे.याशिवाय खामगांव-पंढरपूर महा मार्गावर मेगा कंपनीने मांजरा नदी पुलाच्या दोन्ही बाजूनी एक किलो मीटर वाहतुकी साठी पर्यायी रस्ता दुरुस्त न केल्याने नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे.या रस्त्या वर पडलेले मोठे खड्डे, रिकामे दगड व उडणाऱ्या धुळीमुळे अनेक अपघात होऊन नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.तसेच रात्रीच्या वेळी वाहनांची गती कमी होत असल्याने वाहन लुटणे व चोरीचे प्रमाण वाढलेले आहे.या गंभीर समस्ये बद्दल सतत आंदोलने करून पाठपुरावाकरूनही कंपनीने अद्याप कार्यवाही केलेली नाही.तसेच या कंपनीने केज शहरअंतर्गत भागात रस्त्याच्या कडेने नाली बांधकाम पूर्णकेलेले नाही.याशिवाय एमएमआरडीसी ने या महामार्गावर केज शहर अंतर्गत धारूर रोड वर अद्याप पथदिवे सुरू केलेले नाहीत.




बीड ।प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट चे प्रमुख सुरेश कुटे यांनी वेळोवेळी ठेवीदारांना व्हिडिओच्या माध्यमातून फक्त आश्वासने दिलेली आहेत ते आश्वासनाची पूर्तता करताना दिसून येत नाहीत गेल्या सहा ते सात महिन्यापासून ठेवीदारांना वेठीस धरण्याचे काम ज्ञानराधा मल्टीस्टेट चे सर्वेसर्वा सुरेश कुटे यांनी केलेले आहे येत्या पाच तारखेला त्यांनी जर ठेवीदारांच्या ठेवी परत केले नाही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वात शहराध्यक्ष अविनाश जोगदंड, शहर संघटक सचिव अक्षय कोकाटे, पेठ बीड अध्यक्ष गणेश वाघमारे यांच्या सुरेश कुटे यांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रसिद्धिपत्रकांवर देण्यात आला आहे



## बीडमध्ये उभा राहणार भव्यदिव्य बुद्धसृष्टी

### बैठक : सार्वजनिक जयभिम महोत्सव समितीचा निर्णय

बीड ।प्रतिनिधी

बीडच्या जयभिम महोत्सवाने राज्यात एक लौकिक आदर्श मिळविला आहे. हा महोत्सव समाजाच्या धम्म दनातून साजरा होतो.त्यामुळे एक आगळी-वेगळी ओळख बीड जयभिम महोत्सवाने निर्माण केली आहे. दरम्यान जयभिम महोत्सवातून शिल्लक राहिलेल्या रक्कमेतून आता बीड शहरात भव्यदिव्य बुद्धसृष्टी आणि स्टडीसेंटर उभारले जाणार आहे. असा निर्णय समाज बांधवांनी घेतला आहे. बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून बैठक असयोजित करण्यात आली होती. सदरील बैठक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अमरसिंग ढाका होते. सदरील बैठक अरुण भोले, अजय सवाई, बबन वडमारे, राजू जोगदंड यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत शीतलकुमार सुकाळे, संतोष जाधव यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची शिल्लक असलेली रक्कम यावर चर्चा झाली. त्या रकमेचा विनियोग कसा करायचा बैठकीत ठरले. त्यासाठी १५ लोकांची एक समिती स्थापन करण्यात आली.


पान १ वरून...


**चंपावती महोत्सव....**

समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, समूह गीत गायन, वैयक्तिक गीत गायन, चित्रकला स्पर्धेसाठी इयत्ता पहली ते तिसरी

इयत्ता चौथी ते सहावी, इयत्ता सातवी ते दहावी असा वयोगट असणार आहे तर फॅन्सी ड्रेस स्पर्धेसाठी वयवर्ष पाच ते वयवर्ष १२ असा वयोगट असणार आहे. याबरोबरच फॅमिली डान्ससाठी वयाचे कुठलेही बंधन ठेवण्यात आलेले नाही. सर्व स्पर्धा प्रकारातील सर्व वयोगटासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ तीन असे सहा बक्षीसे देण्यात येणार असून जी शाळा सर्वात जास्त बक्षीस संख्या प्राप्त करेल त्या शाळेस सर्वोत्कृष्ट शाळेचा खिताब मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे मराठी आणि इंग्रजी शाळेचे बक्षीसे वेगवेगळी असणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कुठलाही प्रवेश शुल्क ठेवण्यात आलेला नाही अशी माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.

**गहिनीनाथ गडाला धाकट्या ...**

बहुजन वंचित आघाडी प्रदेशाध्यक्ष प्रकाश आंबेडकर, पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, खा.प्रीतम मुंडे, आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब अजबे, आ.राम शिंदे, आ.लक्ष्मण पवार, आ.मोनिका राजळे, माजी आ.भिमराव धोंडे, उदयसिंग महाराज, जगदीश काळे, विलास बडगे, दिनकर कदम, गंगाधर घुमरे, नानासाहेब काकडे, सुधाकर मिसाळ अरुण बोगाणे, आदी मान्यवर यावेळेस उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री क्षीरसागर यांनी जिल्ह्यातुन आलेले हजारोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

**अंबाजोगाई बसस्थानकाची ...**

करण्यात आले. परंतु, स्थानकातील वाहनतळाच्या रस्त्याच्या कामाचा त्यात समावेश नव्हता. हा रस्ता पूर्णपणे उखडल्याने बसस्थानकात दिवसरात्र धुळीचे साम्राज्य आहे. याचा रुग्ण, विद्यार्थीसह सर्व प्रवाशांना अतोनात त्रास सहन करावा लागतो. सोबतच, स्थानकात इतर अत्यावश्यक सोयीसुविधांचा अभाव आहे. त्यामुळे अंबाजोगाई बसस्थानकातील वाहनतळाचे काँक्रीटकरण करावे आणि वॉटर फिल्टर, सी.सी.टि.व्ही. कॅमेरे सह अत्याधुनिक पाणपोई बांधकामासाठी मंजुरी देऊन शासनाकडून मंडळास निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी करून त्यासाठी पाठपुरावा सुरु ठेवला होता. त्यांच्या मागणीला यश आले असून वाहनतळास काँक्रीटीकरणाचे काम करण्यासाठी सद्यपरस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत निविदेची प्रक्रीया चालू आहे. निविदेची कार्यवाही पूर्ण होताच सदर काम तातडीने कम पूर्ण करण्यात येईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने देण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होताच काँक्रीटकरणाच्या कामाला सुरुवात होणार असल्याने प्रवाशांच्या हाल-अपेष्टा लवकरच संपणार आहेत.

**लिंगायत आरक्षणासाठी ....**

माहिती लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत काला - पाटील यांनी दिली.

वीरशैव लिंगायत समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. लाखोंच्या संख्येने कागदपत्रांवर लिंगायत, हिंदू लिंगायत असलेल्या समाजबांधवांना वाणी नावाला लागू असलेले आरक्षण मिळावे, मंगळवेढा येथील महात्मा बसवेश्वरांच्या स्मारकाचे काम त्वरित सुरू करावे,

महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाचे कर्ज सरसकट लिंगायतांना मिळावे, त्याच्यासाठी शासनाने मोठी तरतूद करावी, महाराष्ट्रभरातील लिंगायत समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा व तालुकापातळीवर वसतिगृह सुरू करावे, या व अन्य मागण्यांसाठी लिंगायत महासंघातर्फे हे मोर्चे काढले जाणार आहेत.

**आरोग्यसेवा कशी करावी...**

साधला. पुढे बोलताना मंत्री उदयजी सामंत म्हणाले, राज्याचे संवेदनशिल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली बाजीराव चव्हाण हे सामाजिक काम करत असताना वैद्यकीय सेवा कशी करावी, वैद्यकीय धोरण कसे राबवावे, याचे नितांत उत्तम उदाहरण म्हणजे आरोग्यसेवक बाजीराव चव्हाण हे होय. बाजीराव चव्हाण यांचे संपूर्ण राज्यभर काम आहे. त्यांच्या कामाला तोड नाही, अशा शब्दांत मंत्री महोदय यांनी चव्हाण यांच्यासह त्यांच्या टीमची प्रशंसा केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी धर्मवीर प्रतिष्ठाणचे मसुराम कदम, अरविंद जाधव, काशीनाथ जाधव, अरुण घुमरे,कृष्णा यादव, दिनकर शिंदे, आण्णा शिंदे, राजेंद्र तांगडे, अक्षय घाडगे, आदिनाथ सुर्वे, आनंद शिंदे, विलास मस्के, महेश साळुंके, संदीप माने, पंकज कदम, विश्वनाथ जाधव यांनी परिश्रम घेतले.

मंत्री उदयजी सामंत यांचे धर्मवीर प्रतिष्ठानकडून जंगी स्वागत

धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकारातून बीड शहरात राज्याचे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांचे जंगी स्वागत करण्यात आले. जेसीबीतून फुलांची उधळण करण्यात आली. यावेळी माजी मंत्री सुरेश नवले, लोकसभा संपर्कप्रमुख विजय पाटील, बीड जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर, युवा सेना जिल्हा प्रमुख अजय सूरवसे, सुमित कोळपे, डॉ.ज्ञानेश्वर जाधव आदींची उपस्थिती होती.


**नाट्यसंमेलनाने फेडले ...**

यांच्या हस्ते व बीड शाखेच्या अध्यक्षा डॉ.दीपा क्षीरसागर, स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, गणेश चंदनशिवे, सचित पाटील, गौरी कुलकर्णी यांच्या हस्ते लातूर शाखेला पुढील कार्यक्रमाचा मान देण्यात आला.

१ व २ फेब्रुवारी रोजी बीड येथे अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने १०० वे विभागीय नाट्य संमेलन पार पडले. यापूर्वी बीडमध्ये ८९ वे नाट्य संमेलन झालेले होते. नाट्य संमेलनासाठी दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. शहरातील नाट्य दिंडीपासून ते अगदी संगीत रजनीच्या कार्यक्रमापर्यंत प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या स्वागत कमानी, शुभेच्छा फलक, कार्यक्रमस्थळी करण्यात आलेली सजावट लक्ष वेधून घेत होती. यासह कार्यक्रमाची वातावरणनिर्मिती हे सर्व क्षण बीडकरांनी डोळ्यांत साचलवे. दरम्यान, कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी बीड येथील नाट्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते लातूर येथील शैलेश गोजमगुंडे यांना नाट्यघंटा व नटराज मूर्तीचे हस्तांतरण करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने रसिक हजर होते.

कलावंतांशी गप्पांतून उलगडले व्यक्तिमत्त्व

विभागीय नाट्य संमेलनात कलावंतांशी गप्पा टप्पा हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमातून रसिकांनाही निवडक प्रश्न विचारण्याची संधी प्राप्त झाली होती. आपल्या लाडक्या कलावंतांचे अनुभव, किस्से ऐकण्यासाठी बीडकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, सचित पाटील, गौरी कुलकर्णी, गणेश चंदनशिवे यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी सिनेसृष्टीतील अनुभव या कलावंतांनी रसिकांपुढे मांडले. बीड येथील रसिकांच्या मनातील अनेक प्रश्न निवेदकाने विचारले. तसेच सद्या सिनेसृष्टीत चालणाऱ्या घडामोडींबाबतही त्यांनी मते मांडली. बीड येथील नवोदित कलावंतांना या क्षेत्रात येण्यासाठी काय केले पाहिजे, यासंबंधीही उपस्थितांकडून मार्गदर्शन केले. व्यक्तीरेखा साकारताना त्याचा व्यक्तीगत जीवनावर काय परिणाम होतात, हे देखील कलावंतांनी मांडले. नवोदित कलावंत नाट्य क्षेत्राचे प्रशिक्षण घेऊन त्यात प्राविण्य मिळवतात, असा सरावही हवा असल्याचे कुलकर्णींनी सांगितले.



श्री क्षेत्र गहीनाथ गडावर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांना घेतले दर्शन गडा वर सत्कार

# नैतिकमूल्यांची जोपासना हीच एड्स प्रतिबंधाची प्रभावी उपाययोना- सुहास कुलकर्णी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर व कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी यांच्या संयुक्त विद्यमाने पंचमुखेश्वर देवस्थान भाटेपुरी येथे सुरू असलेल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष शिबिरात आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम अंतर्गत आज टी. बी. व एड्स या विषयावर जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.सुहास कुलकर्णी जिल्हा एड्स कार्यक्रमाधिकारी जिल्हा रुग्णालय, बीड तसेच दुसरे प्रमुख मार्गदर्शक श्री. विक्रम तिडके प्रयोगशाला तंत्रज्ञ, उपजिल्हा रुग्णालय, गेवराई तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील



आरोग्य समितीचे सदस्य प्रा. डॉ. शिवलाल घुगे, आरोग्य समिती प्रमुख प्रा. शिल्पा ससाणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री. सुहास कुलकर्णी यांनी एड्स म्हणजे काय एड्सची लक्षणे, एड्सची प्रसाराची कारणे, विंडो पिरेड, त्यावरील उपाययोजना,ए. आर. टी टेस्ट डिजिकेअर ॲप याविषयी सविस्तर माहिती दिली.तसेच त्यांनी टीबी या आजाराविषयीं माहिती दिली.यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांची जोपासना करून कुठल्याही व्यसनाला बळी न पडता एड्सवर मात करा असा मोलाचा संदेश दिला.या कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख मार्गदर्शक श्री.विक्रम तिडके यांनी आपल्या मार्गदर्शनातुन एचआयव्ही तपासणीचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.आरोग्य समिती प्रमुख प्रा. शिल्पा ससाणे यांनी निरोगी जीवनासाठी नियमित आरोग्य तपासणीविषयी माहिती सांगितली. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ.शिवलाल घुगे यांनी असे प्रतिपादन केले की मागील काही वर्षांपासून चालू असलेल्या एड्स जनजागृती उपक्रमामुळेच आपल्या बीड जिल्ह्यात बऱ्याच प्रमाणात एड्सच्या प्रसारावर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे.यामध्ये जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष व तेथे कार्यरत असणारे जिल्हा एड्स कार्यक्रमाधिकारी श्री. सुहास कुलकर्णी यांचे योगदान खूप मोठे आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. विद्यार्थी प्रतिनिधी चि.महेश ठोसर, सूत्रसंचालन रा. से. यो. विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. वैभवी कुलकर्णी तर आभारप्रदर्शन कु. वैष्णवी जाधव हिने केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रोफे. डॉ. रामहरी फाटक प्रा. डॉ. राणी जाधव व प्रा. डॉ. शिवाजी काकडे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

# आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा नगरपंचायत कडुन दिव्यांगाना कपड्याचे वाटप !



पाटोदा ।प्रतिनिधी

लोकप्रिय आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमा अंतर्गत नगर पंचायतच्या वतीने दिव्यांग बांधवांना ड्रेस व भगिनींना साडी वाटप, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना स्कूल बॅग दप्तर चे वाटप करण्यात आले, तसेच भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते जयदत्त भैय्या घस होते. तर व्यासपीठावर नगराध्यक्षा सौ. दिपालीताई राजू जाधव, माजी जिल्हा परिषद सभापती महेंद्र गर्जे, पंचायत समिती सभापती केशव रसाळ, रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. नरेंद्र जावळे, ॲड. जब्बार पठाण ची उपस्थिती होती. या वेळी बोलताना युवा नेते जयदत्त भैय्या धस म्हणाले की, १ काही दिवसापूर्वी आण्णांनी आपल्या मनातली भावना व्यक्त केली होती की माझा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने व वंचित घटका सोबत साजरा करण्यात यावा, आणि आण्णांनी सांगितल्या प्रमाणे इच्छे प्रमाणे पाटोदा नगरपंचायतने सामाजिक उपक्रमा अंतर्गत दिव्यांग बांधवांना ड्रेस, दिव्यांग भगिनींना साड्या ब दिव्यांग विद्यार्थी यांना स्कूल बॅग (दप्तर) चे वाटप करून व भव्य असे रक्तदान शिबीर आयोजित करून बाढदिवस साजरा केला या वेळी ४५ रक्त दात्यांनी रक्त दान केले. दिव्यांग घटक हा आपल्या समाजातील अतिशय महत्त्वाचा व वर्चित घटक आहे.पाटोदा नगर पंचायत तर्फे हे सामाजिक उपक्रम घेण्यात आले होते मा. जि.प. सभापती महेंद्र तात्या गर्जे, नगर पंचायतचे गटनेते बळीराम पोटे, नगराध्यक्षादिपालीताई राजु जाधव, उपनगराध्यक्ष शरद बामदळे, आमदार सुरेश धस यांचे स्वीयसहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, मा.जिउपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम भाई पठाण, राजूभैय्या जाधव, सभापती रामेश्वरगोरे, हनूमंत काळे काळे, किशोर आडागळे नगरसेवक ॲड सुशील कोठेकर, महादेवजाधव, रोहिदास गिते, संतोष दादा जाधव, आसिफ सौदागर, आदम सय्यद, सुनीलवाघमारे, श्रीहरी गिते, सतीश घोलप, मा. सभापती केशव रसाळ, जब्बार पठाण,, नरेंद्रजावळे गणेश नारायणकर, किशोरनगर गोजे, जितेंद्र भोसले, प्रवीण जाधव, अंगदसांगले, जितेंद्र सांगळे, दिनेश नारायणकर, जिलानी शेख, अशोक दगडखैर, चेतन जावळे, अरविंद सरवदे, कार्यकर्ते,दाधिकारी, दिव्यांग बंधु भगिनी

# गेवराईत संस्कृती प्रतिष्ठान च्या वतीने ५ फेब्रुवारी पासुन भव्य सत्संग सोहळ्याची सुरुवात

## गेवराईकरांसाठी प्रख्यात कथाकार ह.भ.प प्रकाश महाजन साठे यांची शिवमहापुराण कथेची खास मेजवानी

गेवराई।प्रतिनिधी

येथील संस्कृती प्रतिष्ठान च्या वतिने प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी सोमवार दि.५ फेब्रुवारी पासुन भव्य सत्संग किर्तन सोहळा महोत्सवास प्रारंभ होत असुन या सोहळ्यात महाराष्ट्रातील दिग्गज किर्तनकारांची किर्तन सेवेसाठी उपस्थिती लाभणार आहे. या किर्तन महोत्सवाचे हे १७ वे वर्ष आहे. सध्या या सत्संग किर्तन सोहळ्याची जोरदार तयारी चालु असुन प्रतिष्ठानच्या वतीने सर्व पदाधिकारी आपले मोलाचे योगदान देत आहेत. तरी गेवराईकरांनी या सत्संग किर्तन सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्कृती प्रतिष्ठानच्या वतिने करण्यात आले आहे.

गेवराई येथे संस्कृती प्रतिष्ठान च्या वतीने गेल्या १६ वर्षापासून भव्य दिव्य अश्या सत्संग किर्तन सोहळ्याचे दरवर्षी नियोजनबध्द अयोजन केले जात आहे. यामध्ये शहरातील तसेच तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. तर या वर्षीच्या सत्संग किर्तन सोहळ्यास दि.५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. प्रतिमापूजन रामेश्वर महाराज राऊत, मनोहरभाऊ पिसाळ, शिवनाथ मस्के यांच्या हस्ते व कलश पुजन प्रभाकर पराड, संजय भालशंकर, चंद्रकांत राऊत यांच्या हस्ते होणार आहे. तसेच सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणुन ह.भ.प. नामदेव महाराज बोरिपिंपळगाव, रणवीर पंडित, मंगेश लोळगे, अरुण मस्के, दादासाहेब घोडके, भाऊसाहेब नाटकर, कालिदास नवले, अमित बडे, अजय दाभाडे, आण्णासाहेब राठोड, राजेंद्र मोटे, कुमार ढाकणे, किशोर कांडेकर, साईनाथ परभणे, नितीन देवकते अदिंच्या उपस्थिती मध्ये सत्संग किर्तन सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. तर सत्संग किर्तन सोहळ्यातील दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत. पुर्ण सप्ताह दुपारी १ ते ४ प्रख्यात कथाकार ह.भ.प प्रकाश महाजन साठे यांचे शिवमहापुराण कथा असणार असून सोमवार दि.५ रोजी सायंकाळी ६ वा. संगीत अलंकार इंद्रजीत अण्णा येवले यांची भजनाचा कार्यक्रम सायं ८ वा. ह.भ.प ज्ञानेश्वर धायगुडे शास्त्री ( ज्ञानेश्वर विद्यापीठ श्री क्षेत्र भगवानगड ) यांचे सुश्राव्य किर्तन, तर मंगळवार दि. ६ रोजी सुप्रसिद्ध संगीत अलंकार भाग्यश्री देशपांडे ( मुंबई ) यांचा बोलावा विठ्ठल हा संगीत भजनाचा कार्यक्रम सायं ८ वा. ह.भ.प योगिराज महाराज गोसावी यांचे किर्तन होईल. तर बुधवार दि. ७ रोजी सायं.६ वाजता प्रसिद्ध भारुड सम्राट विष्णू महाराज बांडे यांचा सोंगी भारूडाचा प्रबोधनपर कार्यक्रम सायं.८ वाजता ह.भ.प भागवताचार्य सोपान शास्त्री महाराज यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे. गुरूवार दि.८ रोजी सायंकाळी ६ वाजता तुळशीराम आतकरे यांचा संगीत भजन अलंकार कार्यक्रम संध्याकाळी ८ वाजता ह.भ.प गुरुबाबा औसेकर यांचे सुश्राव्य किर्तन होईल तर शुक्रवार दि.९ रोजी सायंकाळी ५:३० वाजता संत भगवानबाबा अध्यात्म सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळा माजी आमदार अमरसिंह पंडित, सुरेश नवले, स्वामी विवेकानंद शास्त्री व दत्ता बारगजे यांच्या शुभहस्ते व कल्याण आखाडे, विनायक ढाकणे ( पोलिस आयुक्त), संतोष भंडारी, भागवत तावरे आदींच्या उपस्थितीत ह.भ.प महादेव महाजन ( पंचमुखेश्वर संस्थान भाटेपुरी ) यांना देण्यात येणार आहे. तसेच तालुक्यातील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींच्या आईच्या मातृपुजन सोहळा होणार असून या मातृपूजन सत्कारमूर्ती सौ. प्रभावती रावसाहेब जरांगे पाटील, श्रीमती कमलाबाई कैलास अंतरकर, सौ.मंदोदरी निवृत्ती ढाकणे, श्रीमती शकुंतला हरिभाऊ मेघारे, सौ.उषाताई विलासराव वैद्य, सौ.अरुणाताई राधाकिसन नवले, सौ.संगीता रामप्रसाद पिसाळ, सौ.सुदामती भगवान काकडे, सौ. नंदाबाई विष्णूपंत तपासे व सौ.ज्योती अशोक पांजगे आदींचा या कार्यक्रमात मातृपूजन होणार आहे. तर सायं.८ वा. ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज नामदास यांचे सुश्राव्य किर्तन होईल. शनिवार दि.१० रोजी सायंकाळी ६ वाजता सदानंद मगर व वैष्णवी मगरे यांचा अभंगनाद हा कार्यक्रम. तर संध्याकाळी ८ वाजता ह.भ.प गाथामुर्ती तुकाराम महाराज जेऊरकर यांचे सुश्राव्य किर्तन होईल. रविवार दि.११ रोजी सायंकाळी ६ वाजता संगीत अलंकार कृष्णा ठाकर यांचा अभंगनाद हा कार्यक्रम. तर संध्याकाळी ८ वाजता ह.भ.प बापुसाहेब महाराज मोरे देहूकर जेऊरकर यांचे सुश्राव्य किर्तन होईल. सोमवार दि.१२ सकाळी ११ ते १ ह.भ.प पांडुरंग महाराज शितोळे ( आळंदी देवाची ) यांचे अमृत तुल्य काल्याचे किर्तन होईल



# सावित्री फ़ातेमा सद्भावना मंच बीड कार्यकारिणीची बैठक संपन्न

बीड ।प्रतिनिधी

समाजात सामाजिक सलोखा कायम राहावा तसेच सर्व जाती-धर्मातील लोकांमध्ये साम्प्रदायिक सद्भावना निर्माण व्हावी या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या सावित्री फ़ातेमा सद्भावना मंचच्या कार्यकारिणीची बैठक बीड येथे जमात ए इस्लामी हिंद महाराष्ट्र भारतीय समाज विभागाचे सचिव तसेच महाराष्ट्राचे समन्वयक डॉ. सय्यद रफ़ीक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. पारनेरकर यांनी सद्भावना मंचच्या वतीने शहरात विविध कार्यक्रम आयोजन करण्यासंबंधी सूचीत केले. आज संपूर्ण देशात विविध जाती - धर्माला मानणाऱ्या लोकांमध्ये द्वेषाची भावना वाढत आहे. एकेकाळी बंधुभावाने राहणारे लोक आज एकमेकांचा द्वेष करत आहेत. ही बाब राष्ट्रीय एकात्मतेला अतिशय बाधक आहे. याचे उच्चाटन करण्यासाठी तसेच नव्या पिढीला याच्या विनाशकारी परिणामांपासून वाचविण्यासाठी शाळा- महाविद्यालयात याविषयी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यासंबंधि सर्वांचे एकमत झाले.

सद्भावना मंचच्या कार्यकारिणीच्या विस्तारासंबंधी विचार विनिमय करण्यात आला. लवकरच कार्यकारिणीचा विस्तार करण्यात येणार असल्याची माहिती सावित्री फ़ातेमा सद्भावना मंच बीड चे सचिव शेख अब्दुल हमीद यांनी सांगितले.



**प्रतिनिधी।पाटोदा**

**अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज दक्षिणपीठ नानिजधाम (महाराष्ट्र) यांचा पादुका दर्शन सोहळा प्रथमच पाटोदा तालुक्यामध्ये १६ फेब्रुवारी २०२४ शुक्रवार स्थळ, बाळू पाटलाची शेती, पारगाव रोड, पाटोदा. येथे पार पडत आहे या कार्यक्रमाच्या प्रचार प्रसाराच्या गाड्यांचा भव्य शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.**

**या पादुका दर्शन सोहळ्यामध्ये हजारोच्या संख्येने जिल्ह्यातील भाविक भक्त उपस्थित राहणार आहेत कार्यक्रमाची रूपरेषा १६ फेब्रुवारी रोजी सकाळी पाटोदा येथील शिवाजी चौकातून पादुकांची वाद्याच्या गजरामध्ये रॅली निघणार आहे, त्यानंतर कार्यक्रम स्थळी गेल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सामाजिक उपक्रमाचे वितरण होणार आहे, यानंतर मान्यवरांचे मनोगत होईल, त्यानंतर गुरु पूजन होईल,**

# गेवराईतील असंख्य तरुणांचा प्रहार जनशक्ती पक्षात प्रवेश

प्रतिनिधी । गेवराई

येथील शासकीय विश्रामगृहात प्रहार जनशक्ती पक्षाच्या बैठकीत अनेक तरुणांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी या तरुणांचे प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख अर्जुन सुतार यांनी स्वागत करुन शुभेच्छा दिल्या. दि.३१ जानेवारी वार बुधवार रोजी सायंकाळी गेवराई शासकीय विश्रामगृह येथे गेवराई शहरातील पेंटर रघुनाथ खंदारे यांच्यासह आ. बच्चुभाऊ कडू यांच्या विचाराला प्रणित होऊन अनेक युवकांचा प्रहार जनशक्ती पक्षांमध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला. प्रहार जनशक्ती

पक्षाचे गेवराई तालुका अध्यक्ष अर्जुन सुतार यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अल्पसंख्याक बीड जिल्हा अध्यक्ष निजाम खा पठाण हे होते. यावेळी रघुनाथ



खंदारे यांची प्रहार जनशक्ती पक्ष कामगार सेवा तालुकाप्रमुख पदी निवड करण्यात आली. या पक्ष प्रवेश सोहळ्याला प्रहार जनशक्ती पक्षाचे गेवराई शहराध्यक्ष राजू भाई राजा, अशोक दोडके, साहिल दोडके, ओमकार खंदारे, रवी खंदारे, साई घोडके, ओमकार साबळे व इतर गेवराई शहरातील युवा कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवीन पोलीस अधिकारी साळवे यांनी स्वीकारला पदभार

आष्टी ।प्रतिनिधी

अंभोरा पोलीस ठाण्यातील रिक्त पदावर भूम येथे कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी नुकताच अंभोरा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांची विनंती अर्जावरून बीड मुख्यालय येथे त्यांना घेण्यात आले आहे



ढाकणे यांची बदली झाल्यानंतर अंभोरा पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून मंगेश साळवे यांनी पदाची सूत्रे हाती घेतली आहेत आगामी लोकसभा निवडणुकीत पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्ह्यात अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आले आहेत या बदल्या अंतर्गत साळवे यांची बदली करण्यात आली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील हे पोलीस स्टेशन असून कमी पोलीस बळाच्या मदतीने ८० ते ८१ ग्रामीण भागातील खेडे पाडे या गावाचा कारभार या पोलीस स्टेशन अंतर्गत पाहिला जातो साळवे यांनी यापूर्वी मुंबई ,धाराशिव ,

भूम ,या ठाण्यात कामकाज पाहिले आहे एकाच पोलीस स्टेशन अंतर्गत ८१ गाव असल्याने कायदा सुव्यवस्था हातळताना साळवे यांना तारेवरची कसरत करावी लागणार असल्याची चर्चा होत आहे



शिरुरकासार - महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल राज्यमंत्री तथा विद्यमान लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त मतिमंद निवासी विद्यालय शिरूर कासार येथे आण्णा समर्थक आजिनाथ धोत्रे यांच्या वतीने शालेय साहित्य व फळ वाटप करण्यात आले यावेळी मा.सरपंच आसाराम माने, राहुल तीळकर, शहादेव आघाव, मोतीराम माने,अजय शेलार,सुनिल मस्के,मयुरआघाव,अविनाश धनवटे,सर्व शिक्षक व स्टाफ तसेच उत्तमनगर दहिवंडी येथील मित्र परिवार उपस्थित होते..!

# मराठी पत्रकार परिषद संलग्न हवेली तालुका पत्रकार संघाचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न...!

पुणे ।प्रतिनिधी

पुणे : मराठी पत्रकार परिषद संलग्न हवेली तालुका पत्रकार संघाच्या वतीने मकर संक्रांतीच्या निमित्ताने महिलांचा हळदी कुंकू हा कार्यक्रम लोणीकाळभोर कदमवाकवस्ती येथील मराठी पत्रकार संघातील महिला सदस्यांनी आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाला दोन्हीही गावातील महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला.सदरील कार्यक्रम हा कदमवाकवस्ती येथील पालखी स्थळ येथील हॉल मध्ये घेण्यात आला.

या हळदी कुंकू कार्यक्रमाला पत्रकार संघाचे संघटक राम भंडारी यांनी त्यांच्या वाढदिवसाला होणारा खर्च या विधायक कार्यक्रमाला दिला असे हवेली तालुका अध्यक्ष रमेश निकाळजे यांनी सांगितले. हवेली तालुका पत्रकार संघाच्या कार्यकारणीची निवड होऊन फक्त सातच महिने झाले आहेत. या सात महिन्यामध्ये पत्रकार संघाच्या वतीने अंगणवाडीच्या कुपोषित बालकांना सकस आहार तसेच औषधं वाटप करण्यात आले. मराठी पत्रकार परिषदेच्या ८५ व्या वर्धापन



दिनाच्या निमित्ताने तालुका पत्रकार संघाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले त्यावेळी पत्रकार संघातील सर्व सदस्य तसेच २०५ नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. आरोग्य शिबिराचा कार्यक्रम हवेली तालुक्याचे जेष्ठ पत्रकार नाथाभाऊ उंद्रे यांच्या तसेच पुणे जिल्हा संघटक श्रावणी कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला होता. तसेच पत्रकार दिनाच्या दिवशी पत्रकार दिन हवेली तालुका पत्रकार संघाच्या वतीने लोणीकाळभोर येथील ऑफिसवर सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीतीत संपन्न झाला होता. अशा पद्धतीने हवेली तालुका पत्रकार संघाच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रम घेण्यात येत असून पुढील कालावधीत असेच सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार असल्याचे तालुका अध्यक्ष रमेश निकाळजे यांनी सांगितले.त्यावेळी तालुका उपाध्यक्ष स्वप्नील कदम, कोषाध्यक्ष संजय कुलूत, संघटक फकीर इनामदार, राम भंडारी, शहाजी मिसाळ, नामदेव घळगे, रुपालीताई काळभोर, तृप्तीताई कसबे तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# ग्रामसेवक आणि सभा बोलवली परंतु प्रश्नांची सरबती होतात रद्द केली

## गावकऱ्याची गटविकास अधिकाऱ्यां कडे तक्रार

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी येथे २९ जानेवारी रोजी ग्रामसेवकांनी ग्रामपंचायत कार्यालयांना नोटीस लावून ग्रामसभा बोलवली परंतु या सभेत गावकऱ्याकडून प्रश्नाचे सरबत्ती होताच माझ्याकडे चार्ज नसल्यामुळे मला सभा घेण्याचा अधिकार नाही असे सांगून सभा रद्द केली याची चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांनी लेखी स्वरूपात गटविकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांच्याकडे केली आहे.याविषयी सविस्तर वृत्त असे की २९ जानेवारी रोजी या गावात महिलांची ग्रामसभा घेण्यात आली व दिनांक ३० जानेवारी रोजी सर्व साधारण सभा घेण्यासाठी ग्रामपंचायतला नोटीस लावून सभा बोलावण्यात आली म्हणून गावातील सर्व लोक या सभेसाठी ग्रामपंचायत कार्यालय येथे जमा झाले यावेळी ग्राम स्थांनी गावातील अनेक समस्या विषयी प्रश्नांची सरबती केली यामुळे ग्रामसेवक गोंधळून गेले व गावकरी आक्रमक होत आहे असे दिसतात त्यांनी माझ्याकडे चार्ज नाही म्हणून मला सभा घेता येत नाही तसेच कोरम पूर्ण न झाल्याचे कारण देत सभा रद्द केली वास्तविक पाहता कोरम पूर्ण झाला नसेल तर सभा तहकूब करणे आवश्यक असताना ती रद्द का करावी लागली याची चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच चार्ज व कोरमचे कानून देऊन सभा रद्द करून ग्रामस्थांची फसवणूक केल्याचा आरोप ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. या गावात अनेक बेकायदेशीर कामे होत असल्याचा आरोप गावकरी करीत आहेत. या आरोपास घाबरून ग्रामसेवकांनी ही सभा रद्द केली असल्याचा आरोप गावकरी करीत आहेत म्हणून याची सखोल चौकशी करून संबंधित दोषी दोघात योग्य ती कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी या निवेदनात केली असून याची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आली असून या निवेदनावर आकाश श्रीमंत राठोड, राजकुमार मधुकर, रामभाऊ अण्णासाहेब दळवी, संदेश श्रीमंत राठोड, विठ्ठल नारायण सोळंके, अजय विलास राठोड, नितीन दिलीप प्रधान, ज्ञानेश्वर शिवाजी बागल, रोहित रामराव राठोड, राजेश चंद्रभान राठोड, निखिल अंकुश राठोड, प्रल्हाद आबासाहेब दळवी, मधुकर अश्रुबा बागल रंजीत भानुदास जाधव, रामप्रसाद बाळू राठोड यांच्या सह्या आहेत या निवेदनासोबत ग्रामसभेची नोटी व सभा रद्द केल्याचा ठराव याच्या प्रती जोडले आहेत.

दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड जिल्हा

पान -४
PAGE - 4

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

रविवार,दि.०४ फेब्रुवारी २०२४
SUNDAY DT.04 FEBRUARY 2024

## शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात महादेव सवाई ( म्यडी ) यांचा सन्मान!

**बीड ।प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलंनाचे यंदाचे हे १०० रा वे वर्षे असुन, यंदाचा शंभरावा अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलंनाचा सोहळा बीड या ठिकाणी दिमाखदार सोहळा पार पडला.या संमेलनासाठी प्रख्यात नाट्य कलावंत व सिने कलावंतांनी हजेरी लावली होती,नाट्य परिषदेचे अध्यक्ष तथा सिने अभिनेते प्रशांत दामले सह सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, मोहन जोशी, सविता मालपेकर ,निलीमा शिर्के,सुशांत शेलार,भार्गवी चिरमुले, अंशुमन विचारे,कमलाकर सातपुते, डॉं. गणेश चंदनशिवे सह बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्षा दिपाताई क्षीरसागर संमेलनाचे कार्यवाहक डॉं.योगेश भैय्या क्षीरसागर आणी हजारो नाटयकर्मी तथा बीड जिल्ह्यातील नागरिक या सोहळयासाठी हजर होते.या शंभराव्या संमेलनासाठी बीड जिल्ह्यातील नाट्य चळवळ उज्वल करुन नावलौकिक मिळवलेल्या कलाकांराचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये बीडचे नाट्य ते सिनेमा क्षेत्रात यशस्वी प्रवास करणारे कलावंत महादेव सवाई ( म्यडी) यांनी बीड रंगभूमीवर आजवर अनेक एकांकिका, नाटक ,लोकनाट्य, भारुड, लोकगीत, प्रहसन,पथनाट्ये, अशा विविध कलाप्रकारा पासून ते आत्ता मराठी आणी हिंदी भाषेतील सिरीयल्स तसेच अनेक शॉर्ट फिल्म, मराठी व हिंदी सिनेमात आपल्या कलाकार म्हणुन सुरू असलेल्या कामांमुळे व बीडच्या रंगभुमीचा नावलौकिक केल्यामुळे त्यांचा सत्कार अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष तथा सिने अभिनेते प्रशांत दामले , दिपाताई क्षीरसागर तसेच ईतर मान्यवरांच्या हस्ते पार पडला. महादेव सवाई यांचा सुरुवातीचा प्रवास हा नाटकाच्या स्टेज पासुनच झाला आहे. अल्फा मराठी चँनलच्या वायदा या एकांकिके मधून प्रमुख भुमिका करत मराठवाडयाच्या शेतकऱ्यांचे दु:ख त्यांनी आपल्या प्रभावी भुमिकेतुन दाखवले होते , रंगभूमीवर त्यांनी वायदा, उचल, पासुन पर्यंत ,दलीत हत्याकांड, भजन,यातना उत्सव, उष काल होता होता , जे बोंबलत नाही त्याच्या, धुमस् ,हनम्याची मरिआई ,पेटवु क्रांतीची मशाल ,अशा विविध एकांकिका व दोन अंकी नाटकात प्रमुख भुमिका केलेल्या आहेत. आणी आत्ता ते सिनेक्षेत्रात कलाकार म्हणून काम करत असून, लक्ष्य, तु माझा सांगाती, अस्मिता, जयोस्तुते, सावधान इंडिया, क्राईम पेट्रोल, डायल हंडरेड्,टश्नै ईश्क, या हिंदी व मराठी सिरीयल्स मधुन विविध भुमिका करत बायको देता का बायको ,ब्लर कँनव्हास, खींड ,गाव तिथं गावकी भाव तिथं भावकी, अलबेला आलम, श्रीकांत बोल्ला अशा मराठी आणि हिंदी सिनेमात देखील त्यांच्या प्रमुख तथा सह अभिनेता म्हणुन भुमिका आहेत. तसेच दे दान, गाव लय ग्वाड्, लुच्चै सालै,स्टार मराठी च्या गावाकडच्या गोष्टी, हुरसुळा,फ्रि फेअर फेअरलेस ,या शॉर्ट फिल्मस तथा मराठी वेबसिरीज मध्ये प्रमुख भुमिका आहेत.आपल्या कलेच्या आणी अभिनयाच्या ताकतीवर बीड जिल्हयाचे नावलौकिक करणार्या महादेव सवाई ( म्यडी ) यांच्या कार्याचा गौरव अखिल भारतीय नाट्य संमेलनात झाल्यामुळे बीड जिल्ह्यातील कलाक्षेत्रातील कलावंत, नाट्यकर्मी तसेच रसिकांनी महादेव सवाई ( म्यडी ) यांचे भरभरून कौतुक करत .



## ज्ञानेश्वरी ग्रंथ अन् यथोचित सॅल्युट

**वडवणी ।प्रतिनिधी**

वडवणी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमन सिरसट यांनी आपल्या स्वभावानं तालुक्यातील तमाम नागरिकांना अक्षरशः भुरळ घातली आहे. तालुक्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच सर्व समाजाच्या कार्यक्रमात आवर्जून सहभागी होऊन पोलिस खात्यातील एका अधिकाऱ्याचा स्वभाव दाखवून दिला आहे.

श्री.अमन सिरसट यांनी काही दिवसांपूर्वी धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहुन आपल्यातील कलागुण सर्वांसमोर मांडले आहेत. सोन्नाखोटा येथील महादेव महाराज खोटे यांच्या धार्मिक कार्यक्रमातही त्यांनी कानडा राजा पंढरीचा हे भक्ती गीत सादर करून लाखों चाहत्यांकडून वाहवा मिळवली आहे. अशा अधिकाऱ्याचा निश्चितच गौरव केला पाहिजे या उदात्त हेतूने श्री. महादेव महाराज खोटे यांनी आपले मित्र चंद्रकांत खोटे पाटील,दत्तात्रय केदार पाटील,श्रीमंत साळुंखे पाटील,श्रीमंत खोटे पाटील,रामेश्वर कदम पाटील ,रमेश रावजी केदार पाटील,आत्माराम जमाले पाटील यांना सोबत घेऊन पोलीस स्टेशन प्रांगणात यथोचित सत्कार करुन ज्ञानेश्वरी ग्रंथ (पुस्तक) देऊन गौरव केला.यावेळी पोलिस उपनिरीक्षक श्री.राठोड,संपादक अनिल वाघमारे,पोलिस कर्मचारी श्री.माळी,पोलिस कर्मचारी श्री.गुंजाळ सह आदी उपस्थित होते.




## शिंदे सरकारच्या संवेदनशीलतेमुळेच आरक्षणाची लढाई जिंकली : बाजीराव चव्हाण

**बीड ।प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचे लढवय्ये नेते मनोज जरांगे पाटील यांचा दीर्घ लढा, मराठा समाजाची अभूतपूर्व एकजूट आणि सत्तारूढ शिंदे सरकारच्या संवेदनशीलतेमुळे आरक्षणाची लढाई जिंकली, अशा शब्दांत धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू बाजीराव चव्हाण यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, धर्मवीर प्रतिष्ठानच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बीड शहरात पेठे वाटून, फटाक्यांची आतिषबाजी करून डीजे लावून सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी व्यापक आंदोलन उभारणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला अखेर मोठे यश मिळाले आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या सरकारने मान्य केल्या असून त्याबाबतचा अध्यादेश मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी त्यांना आज सुपूर्त केला. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेतले. सत्तारूढ शिंदे सरकार पूर्वीपासूनच मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी तत्पर होते. संवेदनशील शिंदे सरकारने मराठा समाजाला न्याय देण्याचा योग्य निर्णय घेतला आहे, अशी प्रतिक्रिया आरोग्यसेवक बाजीराव चव्हाण यांनी सांगितले. मराठा आरक्षणाचे लढवय्ये नेते मनोज जरांगे पाटील यांचा दीर्घ लढा, मराठा समाजाची अभूतपूर्व एकजूट आणि सत्तारूढ शिंदे सरकारच्या संवेदनशीलतेमुळेच आरक्षणाची लढाई जिंकली, अशा शब्दांत धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांनी सांगितले.



### मंगेश चिवटे, बाजीराव चव्हाण ठरले सरकारचे संवाददूत

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी तत्पर असलेल्या शिंदे सरकारच्या वतीने वेळोवेळी आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्याशी मुख्यमंत्री महोदय यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे, त्यांचे विश्वासू बाजीराव चव्हाण यांनी संवाद साधला. त्यांची शिष्टाई सकारात्मक ठरली आहे. आरोग्यदूत असलेले मंगेश चिवटे, बाजीराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने सरकारचे संवाददूत ठरले आहेत, अशा प्रतिक्रिया राज्यभरातून उमटत आहेत.

विश्वनाथ जाधव यांनी जल्लोष साजरा केला.

### धर्मवीर प्रतिष्ठानकडून बीडमध्ये जल्लोष

सरकारने मराठा आरक्षणावर महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे बीड शहरात धर्मवीर प्रतिष्ठानकडून पेढे वाटून, फटाक्यांची आतिषबाजी करून आणि डीजे लावून सरकारच्या निर्णयाचे जोरदार स्वागत केले. दरम्यान, धर्मवीर प्रतिष्ठाणचे डॉ. ज्ञानेश्वर जाधव, मसुराम कदम, अरविंद जाधव, काशीनाथ जाधव, कृष्णा यादव, दिनकर शिंदे, आण्णा शिंदे, राजेंद्र तांगडे, अक्षय घाडगे, आदिनाथ सुर्वे, आनंद शिंदे, विलास मस्के, महेश साळुंके, संदीप माने, पंकज कदम,

## मतिमंद शाळेस शैक्षणिक साहित्य देवून समाजरत्न विजयराज बंब यांचा वाढदिवस साजरा

### अविरत समजाची सेवा करणार - संपादक विजयराजजी बंब

**शेख आतिख/तलवाडा**

सामजिक बांधिलकी जपत आजपर्यंत सामजिक कार्य केले असून दैनिकाच्या माध्यमातून समाजाच्या समस्या सोडवण्याच्या काम आजपर्यंत केले असून समाजाची सेवा अविरत करणार असल्याचे प्रतिपादन समाजरत्न विजयराज बंब यांनी व्यक्त केले. के.केशवराव धांडे मतीमंद निवासी विद्यालय तलवाडा याठिकाणी वाढदिवसा निमित्त शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटपाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने ते बोलत होते यावेळी व्यासपिठावर गौतमजी खटोड,संजूशेठ बंब,राजेशजी बंब,निवासी संपादक उत्तम हजारे,वृत्तसंपादक भागवत तावरे,उपसंपादक मुकेश झनझणे, व्यवस्थापक अतुल भालशंकर,शाळेचे मुख्याध्यापक घोडके सर,उपसरपंच आक्रम सौदागर,ग्रामपंचायत सदस्य किशोर हत्ते, शेख रफिकभाई, दत्ताभाऊ हात्ते,मदन हातागळे,पत्रकार विष्णू राठोड,शेख खिजर,जयदेव शिंगणे,अल्ताफ कुरेशी, तालुका प्रतिनिधी विनोद पौळ यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना ते म्हंटले की या मतीमंद विद्यालयात लहान मुलांच्या समवेत माझा वाढदिवस साजरा झाला हे मी माझे भाग्य समजतो,या शाळेस भविष्यात मदत लागली तर नीसंकोच करेन असाही विश्वास त्यांनी यावेळी दिला.यावेळी गौतमजी खतोट,वृत्तसंपादक लोकपत्रकार भागवत तावरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले,त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमास शाळेचे घोडके सर,काळे सर,पांडव सर,तांदळे सर,तलवाडा येथील पत्रकार शेख अतिख भाई, विष्णु राठोड,सचिन नाटकर,कालू कुरेशी,यांच्या सह विविध संघटनेचे पदाधिकारी व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .



### ग्रामपंचायत कार्यालयात मान्यवरांच्या वतीने सत्कार

तलवाडा ग्रामपंचायत कार्यालय याठिकाणी संपादक बंब साहेब यांचे स्वागत करून सन्मान करण्यात आला यावेळी सरपंच पती विष्णु हात्ते,उपसरपंच आक्रम सौदागर,ज्येष्ठ सदस्य तथा लेखाधिकारी बळीराम शिंदे, लहू जाधव,गणेश महाराज कचरे,रवींद्र गांधले,जय भवानी कारखान्याचे संचालक डॉ.आसारामजी मराठे,मनसे चे रवी मरकड,माजी सदस्य आर्जुन भांबरे,साहेबराव कुऱ्हाडे,लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे,बाळासाहेब गिरी, हे उपस्थित होते.

### त्वरिता देवी मंदिरावर दर्शन...

तलवाडा येथील महाराष्ट्राच्या भाविक भक्ताचे श्रद्धास्थान असलेल्या त्वरिता देवीचे दर्शन घेऊन आरती करण्यात आली यावेळी देवीचे विश्वस्त सचिव राजाभाऊ खिस्ते व व्यवस्थापक रतन गील यांच्या वतीने संपादक बंब साहेबांचा यथोचित सन्मान करण्यात आला.यावेळी देवीच्या विकास कामांच्या दृष्टीने भविष्यात गरज भासली तर अत्यावश्यक ती मदत करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.



### अपर्णा सोनवणेची राज्यशासनाच्या अर्थ व सांख्यीकी विभागात

## ईन्वेस्टिगेटर ऑफिसर पदि निवड झाल्याबद्दल ग्रामस्थाच्या वतीने सत्कार

**परळी ।प्रतिनिधी**

दि.०३/०१/२०२४ रोजी कु.अपर्णा अंकुशराव सोनवणे हिची राज्यशासनाच्या अर्थ व सांख्यीकी विभागात ईन्वेस्टिगेटर ाफिसर पदि निवड झाल्याबद्दल पापदंडेश्वर मंदिर,गाडे पिंपळगाव ता.परळी वै.जि.बीड येथे गावकऱ्यांच्या वतीने सत्कार/सन्मान करण्यात आला. अपर्णा च्या पाठीमागे आई व वडील या दोघांचे पात्र अपर्णाची आई ललिता सोनवणे यांनी निभावले व चुलते बलभीम विष्णू सोनवणे चुलतभाऊ विष्णू बलभीम सोनवणे खंबीरपणे भाऊ म्हणून पाठीमागे उभा राहून मुंबईत शिक्षणासाठी घेऊन गेला व तिचे शिक्षण पूर्ण केले. वडील नसताना खचून न जाता तिने अनेक अडचणीचा सामना करत हे कौतुकास्पद,गावाला अभिमान वाटवा असे यश प्राप्त केले. त्याबद्दल तिचा समस्त गाडे पिंपळगाव ग्रामस्तांच्या वतीने सत्कार-सन्मान करण्यात आला. यावेळी गाडे पिंपळगाव येथील जेष्ठ नागरिक,सरपंच,उपसरपंच,युवक,शेतकरी,शेतमजूर,महिला तशेच बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## साहित्यिक विठ्ठल जाधव यांना 'बामु'ची डॉक्टरेट

**शिरूरकासार ।प्रतिनिधी**

येथील साहित्यिक विठ्ठल जाधव यांना मराठी विषयात विद्यावाचस्पती (पीएचडी) ही पदवी प्राप्त झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठामध्ये 'बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास - सन २००० ते २०१०' या विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन प्रबंध सादर केला. बीड येथील स्वा. सावरकर महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सोपान सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली महत्वपूर्ण संशोधन कार्य पूर्ण केले.

वर्तमान बालसाहित्यातील कथा, कादंबरी, कविता, नाट्य, चरित्र या अनुषंगाने सखोल मांडणी करून दुर्लक्षित बालसाहित्य विषयाकडे लक्ष वेधले आहे. विठ्ठल जाधव यांची पांढरा कावळा कादंबरी, तिवढा आणि बटाटीची धार हे कथासंग्रह गर्भकळा कविता संग्रह, उंदरीन सुंदरीन, अटर का पटर ही बालसाहित्यातील ग्रंथसंपदा प्रकाशित आहे. बाल साहित्यास महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कारही लाभला आहे. जाधव यांच्या संशोधनामुळे नविन लेखकांना दिशा मिळणार आहे. विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. दासू वैद्य यांनी मराठी बालसाहित्य प्रगल्भतेने साकारले जावे अशी अपेक्षा व्यक्त केली. बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. सूर्यकांत गीते, संत गाडगेबाबा विद्यापीठ नागपूर यांनी प्रबंधावर सखोल निरीक्षण नोंदविले. याकामी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. भाऊसाहेब नेटके यांचे सहकार्य त्यांना लाभले. तर एकनाथ आव्हाड, कैलास दौंड, सय्यद अल्लाउद्दीन, सतिष साळुंके, अनिलकुमार होळकर, सुरेश सावंत यांचेसह मान्यवर लेखकांच्या बालसाहित्याचा विशेष अभ्यास केला.



विठ्ठल जाधव हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित असून विश्व मराठी साहित्य संमेलनात सहभागी झाले आहेत. डॉक्टरेट मिळाल्याने मराठवाडा साहित्य परिषद आणि संतपीठ पैठण येथे जाधव यांचा सत्कार करण्यात आला. तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांमधून पहिलीच डॉक्टरेट पदवी त्यांना प्राप्त झाली आहे. वयाच्या पन्नासाव्या वर्षी पीएचडी करून शिक्षणाला वयाचे बंधन नसते हे त्यांनी सिद्ध केले आहे.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com